ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-I ISSUE-VII DEC. 2014

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# ग्रामिण विकास योजनांच्या अंमलबजावणीत स्थानिक स्वशासन नेतृत्वाची भूमिका

**डॉ. स्मिता काशिनाथराव मरवाळीकर**
श्री. कुमारस्वामी महाविद्यालय औसा

## प्रस्तावना:-

देशाचा विकास हा ब-याच प्रमाणात ग्रामीण भागावरच अवलंबुन असल्याने, तसेच भारताच्या बाबतीत ग्रामीण लोकसंख्येचा विचार करता व एकंदीत शेतीचे प्रमाण विचारात घेता ग्रामीण विकास मोठया प्रमाणावर होणे आवश्यक आहे. यातूनच ग्रामीण विकासाचे महत्व दिसुन येते २ ऑक्टोबर १९५२ रोजी भारतात ग्रामीण भागाचा विकास करण्याच्या उद्देशाने **'सामुदायिक विकास कार्यक्रम'** सुरु करण्यात आले. ३ ऑक्टोबर १९५३ रोजी या कार्यक्रमाचे विस्तारीत रुप म्हणुन **'राष्ट्रीय विस्तार सेवा योजना'** सुरु करण्यात आली. या दोन्ही कार्यक्रमाचे मुल्यमापन करण्यासाठी राष्ट्रीय विकास परिषदेने जानेवारी १९५७ मध्ये बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने शासनास लोकशाही विक्रेंद्रीकरणाच्या माध्यमातून स्थानिक स्तरावर स्थानिक संस्थांची स्थापना करण्याची प्रमुख शिफारस केली. यानुसार शासनाने विविध स्थानिक संस्थांची निर्मीती केली. भारतातील ग्रामीण स्थानिक स्वशासनास पुरेसे अधिकार देण्याच्या दृष्टीकोनातुन व सर्व घटकराज्यातील पंचायतराज व्यवस्थामध्ये एकसुत्रता व समानता आणण्याच्या उद्देशाने केंद्र सरकाने ७३ व्या घटनादुरुस्तीची अंमलबजावणी केली.

## स्थानिक स्वशासनाचा अर्थ :-

स्थानिक स्वशासनास जगातील वेगवेळया देशात वेगवेळया नावांनी ओळखले जाते. स्थानिक स्वशासनाचा नेमका अर्थ समजण्यासाठी काही विचारवंताचे मत लक्षात घेणे गरजेचे आहे ते पुढील प्रमाणे-

### १) इनसायक्लोपीडीया ऑफ ब्रिटानिका:-

"स्थानिक स्वशासन म्हणजे पूर्ण राज्याऐवजी अंर्तगत दृष्टया प्रबंधित आणि लहान क्षेत्रात निर्णय घेणारी व त्यास कार्यान्वित करणारी सत्ता होय,"

**२) डॉ. आशिर्वादम् :-**

"स्थानिक शासन केंद्र सरकार किंवा संघराज्यात राज्य सरकारच्या कायदयाद्वारे निर्मीत एक अशा प्रकारची संस्था आहे की, जी शहर किंवा खेडयासारख्या एका क्षेत्रातील जनतेव्दारे निवडलेले प्रतिनिधी असतात आणि जे आपल्या अधिकार क्षेत्राच्या मर्यादेत प्रदत्त अधिकाराचा उपयोग जनकल्याणसाठी करीत असतात."

**३) कार्ल फ्रेडरिक :-**

जर स्थानिक उद्देशाच्या दृष्टीने विचार केला तर स्वायत शासन स्थानिक समाजावरील अशी प्रशासकीय व्यवस्था आहे की, जी व्यवस्थापनाच्या नियमाव्दारेच अशा प्रकारे नियमित केली जाते की, जी सरकारच्या सत्तेचे तोपर्यंत प्रतिनिधित्व करीत असते की, जोपर्यंत ती स्थानिक स्वरुपात सक्रिय असते.

वरील व्याख्येवरुन स्थानिक स्वशासन म्हणजे काय हे दिसुन येते. स्थानिक स्वशासनाच्या माध्यमातून ग्रामीण विकास कसा करता येतो हे पहाणे गरजेचे आहे.

**ग्रामिण विकासाच्या योजना :-**

देशाच्या सर्वांगिण विकासाबरोबरच ग्रामीण विकासावर प्रामुख्याने भर देणे ही आज काळाची गरज आहे. कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेअंतर्गत ग्रामीण विकासाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळातील घटकापर्यंत पोहचविण्यासाठी स्थानिक स्वशासन आधारस्तंभ असून त्या ग्रामीण विकासाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळातील घटकापर्यंत पोहविण्यासाठी स्थानिक व शासन आधार स्तंभ असून तो त्या ग्रामीण विकासाचा कणा आहे. ग्रामीण विकास आणि शासकिय योजनांची भुमिका हा विषय जेवढा गंभीर आहे तेवढेच त्याचे स्वरुप मोठे आहे. ग्रामीण विकासाच्या योजना आखताना गरीब व्यक्ती समोर ठेवुन योजना आखल्या जाव्यात. आणि या योजनाचा जास्तीत जास्त फायदा त्या गरीब व्यक्तीला होईल असे धोरण निश्चित करुन जर ग्रामीण विकासाच्या योजना आखल्या गेल्या तर निश्चित पणे भारतातील खेडयात राहणारी जनता सुखी होईल व देश समृध्द व विकसित होईल.

**यातील काही प्रमुख योजना पुढील प्रमाणे :-**

**१) सामुदायिक विकास कार्यक्रम –( १९५२ ):-**

ग्रामीण क्षेत्रात राहणा-या जनतेच्या सर्वांगीन विकासाच्या प्रयत्नांचा पहिला भाग म्हणजे सामुदायिक विकास कार्यक्रम होय. या द्वारे कृषी, पाणीपुरवठा, वाहतुक व दळणवळण , शिक्षण, आरोग्य, रोजगार, गृहनिर्माण , समाजकल्याण, प्रशिक्षण इत्यादी घटकांचा समावेश करुन ग्रामस्थांचा पुढाकार व सहकार्यातुन

विकासासाठीचे प्रशासन निर्माण करण्याचे प्रयत्न झाले. यासाठी केंद्र स्तर , राज्यस्तर व गट स्तरावर मोठयाप्रमाणात प्रयत्न झाले ग्रामीण विकास साधण्यासाठी शासनाची मदत प्रथमच अनुभवन्यात आली.

**२) राष्ट्रीय विकास सेवा (१९५३) :-**

ग्रामीण विकास करण्यासाठीच्याच प्रयत्नाचा दुसरा भाग म्हणजे राष्ट्रीय विकास सेवा होय हि सेवा विकास कार्यासाठी मुलभुत संघांना शासकिय कर्मचारी व अधिकारी यांना मदत पुरवणार होती.

**३) सिमांत शेतकरी व शेतमजुर विकास कार्यक्रम (MFAL - 1970):-**

सिमांत शेतकरी व भुमिहिन शेतमजुर हे ग्रामीण भागातील सर्वात दुर्बल घटक आहेत त्याच्या विकासासाठी सरकारने १९७०-७१ पासुन हा विषेश कार्यक्रम अंमलात आणल्या नंतर १९८० मध्ये एकात्मीक ग्रामीण कार्यक्रमात ही योजना विलीन करण्यात आली.

**४) अल्प भुधारक विकास कार्यक्रम (FDA - 1971):-**

अल्प भुधारक हे ग्रामीण भागातील कमकुवत असल्याने त्यांच्या विकासासाठी हा कार्यक्रम १९७१ मध्ये सुरु करण्यात आला. नंतर हा कार्यक्रम ( IRDP ) मध्ये समाविष्ट करण्यात आला.

**५) वीस कलमी कार्यक्रम (१९७५) :-**

ग्रामीण विकासासाठी मैलाचा दगड ठरलेला एक महत्व पुर्ण कार्यक्रम म्हणजे तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी सुरु केलेला वीस कलमी कार्यक्रम होय. दारिद्रय निर्मुलनासाठी या कार्यक्रमात अनेक तरतुदीचा समावेश करण्यात आला.

**६) कामासाठी धान्य योजना (FFW-1977)**

१९७७ मध्ये केंद्र सरकारने कामासाठी धान्य योजना सुरु केली. या योजनेचे ‘कामाच्या मोबदल्यात धान्य’ असे सुरु होते. देशातील दुष्काळाचा तडाखा बसलेल्या ८ राज्यात हा कार्यक्रम सध्या राबविण्यात येत आहे.

**७)ट्रायसेम योजना (१९७९):-**

१५ ऑगस्ट १९७९ रोजी ग्रामीण युवकांना रोजगाराच्या व्यापक संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने 'ट्रायसेम' ही योजना सुरु करण्यात आली. ग्रामीण युवकांना स्वयं रोजगाराचे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवुन प्रशिक्षण देणे हा या कार्यक्रमाचा पाया आहे.

**८)बायोगॅस कार्यक्रम(१९८२):-**

ग्रामिण भागातील लोकांना स्वयंपाकासाठी व प्रकाश मिळविण्यासाठी बायोगॅसचा वापर करण्यासाठी अनुदान देवुन प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**९) ग्रामिण क्षेत्रासाठी महिला व बालकल्याण कार्यक्रम (१९८२):-**

ग्रामीण भागातील महिला आणि बालकांचा विकास व्हावा या हेतुने हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. नंतर हा कार्यक्रम ( IRDP ) मध्ये समाविष्ठ करण्यात आला.

**१०) इंदिरा आवास योजना (IAY-1985 ):-**

इंदीरा आवास योजना ही ग्रामिण भागाचा विकास करण्यासाठी दारिद्रय रेषेखालील सर्वसाधारण अनुसुचित जाती –जमाती , वेठबिगार ,विमुक्त, बेघर लोकांना घरकुल बांधुन त्यांच्या निवा-याची सोय उपलब्ध करुन दिली जाते.

**११) स्वर्ण जंयती ग्राम स्वयं रोजगार योजना (SGSY-1999 ):-**

ग्रामीण विकासाचे विविध कार्यक्रम एकत्रित करुन १९९९ पासुन हा नवीन कार्यक्रम सुरु करण्यात आला. या योजनेत केंद्र व राज्याकडुन निधी उभारण्यात येतो.

**१२) संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान (2000):-**

ग्रामीण भागातील ग्राम स्वच्छतेच्या कार्यास चालना मिळुन तेथील ग्रामस्थांचे जीवनमान व आरोग्यमान उंचावण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या वतीने २ ऑक्टोबर २००० रोजी हे अभियान राबविले गेले. 'स्वच्छतेतुन समृध्दी कडे' ही संकल्पना असित्वात येण्यासाठी हे अभियान मुर्त स्वरुपात आणले गेले.

**१३) पंतप्रधान ग्रामसडक योजना (2000):-**

पंतप्रधान ग्रामसडक योजना सुरु करुन ५०० लोकसंख्या असलेल्या गावांना बारमाही दळणवळणासाठी जोडण्याचा कार्यक्रम सुरु करण्यात आला.

**१४) पंतप्रधान ग्रामोदय योजना (2001):-**

ग्रामीण भागात पिण्याचे पाणी, पक्के घरे , आणि गावागावाला जोडणारी रस्ते, अशी रचनात्मक कामे करण्याचे उदिदष्ठ ठरविण्यात आले.

**१५) राजीव गांधी ग्रामीण विदयुतिकरण कार्यक्रम (2005):-**

देशाच्या सर्व ग्रामीण भागात विदयुत पुरवठा करुन जास्तीत जास्त लोकांना वीज पुरविण्याचे कार्य करण्याचे निश्चित करण्यात आले.

**१६)महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (2006 ):-**

स्थानिक लोकांचा आर्थिक विकास करण्यासाठी भारत सरकाने ही योजना सुरु केली ही योजना सुरुवातीला फक्त २०० जिल्हात सुरु करण्यात आली व नंतर २००८ पासुन देशातील सर्व जिल्हात लागू केली.

**१७)पशुधन विमा योजना (2006 ):-**

हि योजना देशातील १०० जिल्हयामध्ये सुरु करण्यात आली या १०० जिल्हातील १५ लाख जनावरांना या विमा योजनेचा फायदा सरकारच्या सहकार्याने देण्याचे निश्चित करण्यात आले. यामुळे पशुपालकांना काही प्रमाणात मदत होईल या हेतुने हि योजना अंमलात आणली गेली.

**१८)आम आदमी विमा योजना (2007):-**

ग्रामीण भागातील शेतकरी व ग्रामीण भुमी हीन परिवारांना केंद्र व राज्याच्या सहकार्याने त्यांचा मृत्यू झाला किंवा अपंगत्व आले तर आर्थिक साहय देण्याची व्यवस्था करण्यात आली.

**१९)महात्मा गांधी तंटामुक्ती मोहिम (2007):-**

१५ ऑगस्ट २००७ रोजी महाराष्ट्र शासनाने हि मोहिम सुरु केली शांततेकडुन समृध्दीकडे नेणारी ही योजना आहे. सामाजिक शांतता ,सुरक्षितता, या घटकाला वृध्दीगंत करण्यासाठी ही मोहिम आदर्श अभियान ठरली आहे.

२०) मार्च २००८ पर्यंत देशातील १ लाख गावामधील ब्रॉडबँड कनेक्टीव्हीटी ने जोडण्याचा संकल्प २००६ साली सुरु केलेल्या ग्रामीण व्यापार योजेनेमध्ये केलेला असल्याचे दिसते.

## सारांश-

स्थानिक स्वशासन ग्रामिण स्तरावरील समस्या सोडविण्यास कटीबदध असल्याचे आपणास दिसुन येते वरिल विविध कार्यक्रम व योजना ग्रामीण विकासाठी केंद्र शासन व राज्यशासन स्थानिक स्वशासनाच्या माध्यमातून राबवितात. विकासाचे मुख्य ध्येय व्यक्तीचा विकास करणे हे असते. ज्यामुळे व्यक्तीच्या राहणीमान जीवनशैलीत सुधारणा होईल. त्यासाठी सर्व लोकांनी या विकास प्रक्रियेत सहभागी झाले पाहीजे. ग्रामीण विकासाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण जनतेला माहिती दिली पाहिजे तरच अपेक्षीत विकास होवु शकतो.

## संदर्भ ग्रंथ :-

१) भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या :-काचोळे दा. धो.
२) ग्रामीण विकास मार्गदर्शक - अभय प्रकाशन नांदेड
३) लोकप्रशासन - बी.एम. चोपडा
४) भारत मे ग्रामीण विकास – के. सी. पंत
५) स्थानिक स्वराज्य संस्था – प्रा. गोविंद यमलवाड